२२२८

जा.क्र. डॉबासाकोकृवि/संशो.संपा./ ९८०२ /१७
डॉ.बा.सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
दिनांक : 28 SEP 2017

प्रति,

----------------------------------

----------- कृ. मा. प. ----------

----------------------------------

**विषय : वार्षिक अहवाल २०१५-१६ (मराठी आवृत्ती) छपाई, बाईंडिंग व लॅमिनेशन करण्यासाठीचे दरपत्रक पुरविणेबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचा सन २०१५-१६ चा वार्षिक अहवाल **(मराठी आवृत्ती)** पुस्तक स्वरुपात छपाई करुन घेण्याचे प्रस्तावित आहे. तरी सदर छपाईचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | प्रतींची संख्या | एकूण रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | ▪ वार्षिक अहवाल २०१५-१६ **(मराठी आवृत्ती)** अंदाजे ६० पृष्ठ (मुखपृष्ठ व मलपृष्ठांसहित)<br>▪ साईज : १-४ डेमी साईझ आर्ट पेपर, फोर कलर प्रिंटींग व बाईंडींग<br>▪ मुखपृष्ठ व मलपृष्ठ २५० जीएसएम जाडीचे (फोर कलर प्रिंटींग) लॅमिनेशन व बाईंडींग<br>▪ आतील पृष्ठे-१३० जीएसएम जाडीची (फोर कलर प्रिंटींग) | २०० | |

छपाईचा मजकूर "कोरल-ड्रॉ" मध्ये छपाईसाठी पुरविण्यात येईल. तरी वरील छपाई व बाईंडिंगचे दरपत्रक निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयास सिलबंद लखोट्यातून सदर पत्राच्या संदर्भ क्रमांकासह **दिनांक १२/१०/२०१७** पर्यंत या कार्यालयास कार्यालयीन वेळेपर्यंत पोहोचतील, असे पाठविण्यात यावेत. लखोट्यावर **वार्षिक अहवाल २०१५-१६ (मराठी आवृत्ती) छपाई, बाईंडिंग व लॅमिनेशन करण्यासाठीचे दरपत्रक** असा ठळक उल्लेख असावा. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.

१. दरपत्रक सादर करतांना दरपत्रक धारकाने GST क्रमांक नमूद करावा. दरपत्रकात छपाईदर व GST दर हे स्वतंत्र दर्शविण्यात यावेत.

२. अटीयुक्त दरपत्रक स्वीकारले जाणार नाही. दरपत्रक सर्व करांसहित तसेच वाहतूक व प्रासंगिक शुल्कासह असावे. वार्षिक अहवालाच्या प्रती या कार्यालयात पोहोच करुन देणे आवश्यक आहे.

३. टपालाद्वारे दरपत्रक पोहोचण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

आपला विश्वासू,

**(प. म. हळदणकर)**
संशोधन संचालक

ISSUED